**नि.क्र.२३**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ चा जबाब</u>**

साक्षीदाराचे नावः– **लिंबराज बाबूराव उलमुलगे,**

वयः– ५० वर्षे, व्यवसायः– **शेती,**

राहणारः– वाकसा**, तालुका निलंगा जिल्हा लातूर.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधीज्ञ श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचेमार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०१.** घटना दिनांक २२.०६.२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मौजे वाकसा येथे माझ्या घरासमोर घडली होती. त्या दिवशी रस्त्यामध्ये दगड पडले होते. मी त्या रस्त्यावर वाळू टाकत होतो. आरोपी क्र.१ ते ३ व मुक्ता हे मला शिवीगाळ करत आले. मी त्यांना तुझा जागा जेथून असेल तेथून देण्यास तयार आहे असे म्हणाला. आरोपी मला वाटणी न होता तु रस्ता कसा काय बनवला असे म्हणाले. आरोपी क्र. १ ने बाजूस पडलेली काठी घेवून मला मारहाण केली. त्याने मला डाव्या पायाच्या गुडघ्यावर आणि डोक्यात काठी मारली. त्यामुळे मला त्या ठिकाणी दुखापत झाली. त्यानंतर आरोपी क्र.२,३ आणि मुक्ता यांनी मला लाथा बुक्यांनी मारहाण केली. माझी पत्नी आणि मुलगा अविनाश मला सोडवण्यासाठी आले असता त्यांना आरोपी क्र.१ ते ३ आणि मुक्ता यांनी लाथा–बुक्यांनी मारहान केली. आरोपींनी मला याच्या नंतर काही केलास तर तुझा मर्डर करु अशी धमकी दिली. सारीका उलमुलगे आणि विजयकुमार उलमुलगे यांनी सदरचे भांडण सोडवले. त्यानंतर मी कासार सिरसी पोलिस स्टेशनमध्ये गेलो होतो. पोलिसांनी मला सिरसी येथील सरकारी दवाखाण्यात पाठवले. तेथे मी, अविनाश आणि पार्वतीने उपचार घेतले.

तेथून आम्ही निलंगा येथील सरकारी दवाखाण्यात आलो. त्यांनी आम्हाला सिटी स्कॅनची व्यवस्था नसल्यानी लातूर येथील सरकारी दवाखाण्यात पाठवले. उपचार झाल्यानंतर दिनांक २५/०६/२०२३ रोजी मी घडलेल्या घटनेची फिर्याद दिली. (आता मला प्रस्तूत कामातील फिर्याद दाखवण्यात आली.) ती फिर्याद मी दिलेली असून त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास निशाणी २४ देण्यात आली. आरोपी क्र. १ ने ज्या काठीने मला मारले ती काठी दाखवल्यास मी ओळखतो. (आता मला प्रस्तूत कामातील एम.आर. क्र. ३९/२०२५ वरील जप्त काठी दाखवण्यात आली.) त्याच काठीने आरोपी क्र. १ ने मला मारहाण केली होती. मला मारहाण करणाऱ्या आरोपी क्र.१ ते ३ आणि मुक्ता यांना ओळखतो. आरोपी क्र.१ न्यायालयात हजर आहे. उर्वरीत आरोपी आज न्यायालयात हजर नाहीत. मी त्या सर्वांना ओळखतो.

**आरोपी क्र.१ न्यायालयात हजर आरोपी क्र.२ हा अजारी असून आरोपी क्र.३ त्याच्यासोबत दवाखाण्यात आहे असे आरोपी क्र.१ ने सांगीतले. त्याच्या विनंतीवरुन उलटतपास तहकूब केला.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.07.24 10:57:49 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

**दिनांकः–२३/०७/२०२५.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा.**

**ठिकाणः–निलंगा** **जिल्हा लातूर.**